**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक-25.04.2026** **वार- शनिवार**

---

**'ज्ञानभारतम्'**

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीनं राबविण्यात येणाऱ्या 'ज्ञानभारतम्' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिम १६ मार्च पासून सुरु झाली आहे. हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीनं भारत सरकारनं या प्रकल्पाची आखणी केली आहे. नागरिकांकडे असलेल्या हस्तलिखितांची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲपवर अपलोड करुन राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदविण्याचं आवाहन शासनाकडून करण्यात आलं आहे.

**सदर्नकमांड**

पुण्यातील लष्कराच्या दक्षिण मुख्यालया अंतर्गत कमांड हॉस्पिटलच्या सेंट्रल किचन आणि मेकॅनिकल लॉन्ड्री सेवांना लष्करी आरोग्यसेवेत उत्कृष्टतेसाठी नोवो स्टार मॅनेजमेंट सिस्टिम्स सोल्युशन्स इंडिया या कंपनीच्या सहकार्यानं, ISO 9001:2015 प्रमाणपत्र मिळालं आहे. अलीकडेच या रुग्णालयाला रक्षा मंत्री चषकही मिळाला होता. या यशामागे रुग्णालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं समर्पण, व्यावसायिक दृष्टी आणि संघभावना अधोरेखित होत असून सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या प्रयत्नांना चालना मिळाली आहे.

**आषाढीवारी**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर देहू, आळंदी तसंच सासवड इथून प्रस्थान करणाऱ्या पालखी सोहळ्यांच्या मार्गावरील रस्ते, मुक्कामस्थळे आणि सोयीसुविधांबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आढावा बैठक घेतली. वारकऱ्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यापूर्वी २१ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी कितपत झाली याचाही सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील दूरस्थ पद्धतीनं तर निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आणि इतर अधिकारी, तसंच देहू, आळंदी आणि संत सोपानदेव संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.

संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील ईनामदार वाडा परिसरातील रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादनाची कार्यवाही, आकुर्डी इथल्या पालखी मुक्कामासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देणे तसंच तिथले रस्ते आणि मेट्रोची कामं पालखी आगमनापूर्वी पूर्ण होतील याची खात्री करणे यासह इतर अनेक आदेश या बैठकीत देण्यात आले. पालखी मार्गावरील सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थापनात समन्वय साधण्यासाठी, डीवायएसपी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

**पुरस्कार**

आपण आजवर व्यापार, बाजारपेठा, ज्ञान आणि माहितीचं जागतिकीकरण केलं परंतु आता करुणेचं जागतिकीकरण करण्याची वेळ आली आहे, असं मत नोबेल शांतता पुरस्कार विजेते आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कैलाश सत्यार्थी यांनी काल पुण्यात व्यक्त केलं.  दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठानतर्फे, कैलाश सत्यार्थी यांना, लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कारानं गौरवण्यात आलं. विविध क्षेत्रातील मान्यवरांना दिले जाणारे दीनानाथ मंगेशकर पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ उद्योजक प्रतापराव पवार यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. मोहन आगाशे, सुबोध भावे, महेश काळे, शमा भाटे, प्राजक्ता माळी,धनंजय केळकर, आणि अच्युत गोडबोले यांनाही विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आलं.  या सोहळ्याला पंडित हृदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**नेमणूक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवर वर्ष २०२६-२७ या कालावधीसाठी शिकाऊ उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्याकरता  www.pcmcindia.gov.in या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. मनपाच्या विविध विभागात १२ व्यवसायाच्या एकंदर ४०७ जागा आरक्षणनिहाय भरण्याकरीता उपलब्ध आहेत. यासाठी वर्ष २०२३, २०२४ आणि २०२५ मध्ये संबंधित व्यवसायामध्ये आयटीआय उत्तीर्ण झालेले प्रशिक्षणार्थी ऑनलाइन अर्ज करू शकतील.

**पाणीप्रश्न**

पुणे शहरावर पाणीकपातीची टांगती तलवार असतानाच पुणेकरांना अघोषित पाणी कपातीचा काल अनुभव आला. गुरुवारी शहराचा पाणीपुरवठा बंद होता. हा पाणीपुरवठा सुरळीत होणे अपेक्षित असताना देखभाल-दुरुस्तीची कामे वेळेत न संपल्याने ठरलेल्या वेळापत्रकानुसार काल पाणी आलं नाही. अचानक वाढलेल्या मागणीमुळे नागरिकांना टँकरही लवकर मिळाले नाहीत आणि लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचीच गैरसोय झाली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ४१ तर किमान २४ पूर्णांक 3 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमान असंच असेल आणि संध्याकाळी मेघगर्जना आणि वीजांसह हलका पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**